# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड  जा.क्र.  222/2023  दिनांक : 08.06.2023

## 1)घरफोडी :–

**मुखेड** :– दिनांक 06.06.2023 रोजी चे 20.30 ते दि. 07.06.2023 चे 05.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहते घरी मौ. जांब (बु) ता. मुखेड जि. नांदेड येथे**, यातील कोणीतरी आज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घराचे लोखंडी गेटचे कुलूप तोडुन घरामध्ये प्रवेश करून रूममध्ये असलेल्या कपाटात ठेवलेले सोन्या–चांदीचे दागिने व नगदी रूपये असा एकुण 1,53,400/–रूपयाचा ऐवज चोरून नेला. वगैरे **फिर्यादी बळीराम दिगांबर कदम, वय 47 वर्षे, व्यवसाय चालक रा. जांब (बु.) ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरन 180/2023 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री फड, मो.क्रं. 9130087444** हे करीत आहेत.

## 2)मो. सा. चोरी :–

**1)शिवाजीनगर** :– दिनांक 04.06.2023 रोजी चे 10.15 वा. ते दि. 05.06.2023 चे 17.00 वा. चे दरम्यान, **सिध्दीविनायक हॉस्पीटल वाडीया फॅक्टरी शिवाजीनगर नांदेड येथे**, यातील फिर्यादीची रॉयल इनफिल्ड कंपनीची बुलेट किंमती 1,50,000/–रूपयाची नमुद ठिकाणा वरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी डॉ. विनयकुमार साहेबराव मोरे, वय 42 वर्षे, श्री सिध्दीविनायक हॉस्पीटल वाडीया फॅक्टरी शिवाजीनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरन 175/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री घुगे, मो. क्रं. 9822720567** हे करीत आहेत.

**2)किनवट** :– दिनांक 07.06.2023 रोजी चे 01.00 ते 04.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीच्या घरासमोर साठेनगर बौध्द विहार किनवट ता. किनवट जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादीची हिरो पॅशन प्रो कंपनीची मो सा किंमती 20,000/–रूपयाची नमुद ठिकाणा वरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी स्वामी नरसिमलु नुतनपेल्लीवार, वय 49 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. साठेनगर बौध्द विहार ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरन 144/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1062 बाडगुरे, मो. क्रं. 8805981062** हे करीत आहेत.

## 3)चोरी :–

**उमरी** :–दिनांक 06.06.2023 रोजी चे 13.00 वा. चे सुमारास, **दातांचा दवाखाना उमरी ता. उमरी जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादीने त्याचे घरकुलाचे आलेले पैसे 45,000/–रूपये ग्रामीण बँक उमरी येथुन उचलुन प्लास्टीकचे पन्नीमध्ये गुंडाळुन नायलॉनचे पिशवीमध्ये ठेवुन त्यांचे पत्नीच्या दातांचा विलाज करणे कामी स्माईल दातांचा दवाखाना उमरी येथे गेला असता त्याचे नायलनच्या पिशवी मधील 45,000/–रूपये कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी मोहन गंगाराम कदम, वय 55 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. कारला ता. उमरी जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं 144/2023 कलम 379, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री कदम, मो.क्र. 9623658510** हे करीत आहेत.

## 4)गंभीर दुखापत :–

**1)भोकर** :–दिनांक 05.06.2023 रोजी चे 12.00 वा. चे सुमारास, **आरोपीच्या घरा समोर मौ. नांदा बु. ता. भोकर जि. नांदेड येथे**, यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून यातील फिर्यादीने आरोपीच्या शेतात मटण आणण्यासाठी गेला होता. त्यावेळी आरोपीने फिर्यादीस तु आमचे घरी माणसं घेवुन का आलास. आमचे नवरा बायकोचे भांडण होते.आम्ही आमचे घरी मिटवुन घेतलो असतो असे म्हणुन आरोपीने तु लई शहाणा झालास का असे म्हणुन शिवीगाळ करून हातातील सुरीने उलटी करून डोक्यात मारून गंभर दुखापत केली. तसेच बुक्याने नाकावर मारून नाकाचे हाड फॅक्टचर केले. वगैरे **फिर्यादी गोविंद पि. माधवराव जाधव, वय 38 वर्षे, व्यवसाय शेती रा. नांदा(बु.) ता. भोकर जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरन 205/2023 कलम 326, 323, 504, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2820 जाधव, मो. नं. 9823227195** हे करीत आहेत.

## 5)विवाहीतेचा छळ :–

**1)मुखेड :– दिनांक 18.12.2022 रोजी लग्न झाल्यानंतर एक महिन्यापासुन आज पावेतो, फिर्यादीचे सासर घरी कुसूमताई शाळेजवळ सिडको व माहेरी मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुझे माहेरहुन नौकरीसाठी एक लाख रूपये घेवून ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून उपाशी पोटी ठेवुन शारिरीक व माणसीक छळ केला. व घराबाहेर हाकलुन देवुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 24 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 181/2023 कलम 498(अ),323,504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री पांडे, मो.क्रं. 7588068256** हे करीत आहेत.

**2)मुक्रामाबाद :– लग्न झाल्यापासुन दोन ते तीन महिने ते दि.22.04.2023 पावेतो, सासरी नांदेड व माहेरी मुक्रामाबाद ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुझे माहेरहुन घरबांधकासाठी दहा लाख रूपये हुंडया पोटी घेवून ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून शारिरीक व माणसीक छळ केला. वगैरे **फिर्यादी 25 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रामाबाद** गुरनं 137/2023 कलम 498(अ),323,504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1996 आडेकर, मो.क्रं. 9823156052** हे करीत आहेत.

## 6)फसवणुक :–

**वजिराबाद :–** दिनांक 01.01.2000 ते दि. 20.04.2023 चे पुर्वी वेळ नक्की नाही, **नांदेड पोलीस भरती पोलीस अधिक्षक कार्यालय नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून बनावट प्रकल्पग्रस्ताचे प्रमाणपत्र तयार करून ते खरे आहेत असे भासवुन नांदेड जिल्हा पोलीस भरती –2021 ची मध्ये समांतर आरक्षणाचा लाभ मिळवण्याच्या हेतुने पोलीस अधिक्षक कार्यालय नांदेड येथे कागदपत्रे सादर करून शासनाची फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी माणिक आबासो ढोके, ने. पोस्टे शिवाजीनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरन 208/2023 कलम 419, 420, 467, 468, 471, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री मुत्येपोड, मो.नं. 9146579102** हे करीत आहेत.

## 7)जुगार :–

**1)इतवारा :–** दिनांक 07.06.2023 रोजी चे 16.30 वा. चे सुमारास, **हिराभाई भाटेवाला चहाच्या दुकनासमोर रोडवर इतवारा नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 1290/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/436, एकनाथ सखाराम मोकले, ने. पोस्टे इतवारा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 168/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2201 शकिल शेख, मो.क्रं. 02462–236510** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय,नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 223/2023 दिनांक : 08.06.2023

**फेसबुक अंकाऊंटवरून अक्षेपाई पोस्ट टाकणाऱ्या व्यक्ती विरूध्द पोस्टे वजिराबाद येथे गुन्हा दाखल...**

दिनांक 07.06.2023 रोजी आपल्या फेसबुक अकांऊटवरून अक्षेपाई पोस्ट सोशल मिडीयावर प्रसारीत केल्यामुळे संबधीत आरोपी विरूध्द पोस्टे वजिराबाद येथे गुन्हा क्रमांक 205/2023 कलम 505 भादवि कायदा प्रमाणे दाखल करण्यात आला आहे. यातील सदर इसमाने दोन समाजाच्या भावना दुखवून समाजामध्ये तेड निर्माण करणारी अक्षेपाई पोस्ट फेसबुकवरून प्रसारीत केली म्हणुन गुन्हा दाखल करून सदर गुन्हयाचा तपास पोउपनि श्री रमेश खाडे, हे करीत आहेत.

**मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. श्री अबिनाश कुमार**, अपर पोलीस अधिक्षक नांदेड, यांनी अशा प्रकारचे पोस्ट प्रसारीत करणारा व्यक्ती मग तो कोणत्याही जाती धर्माचा असेल त्या विरूध्द गंभीर स्वरूपाची कार्यवाही करण्यात येईल. अशा प्रकारचे अक्षेपाई मचकुर, बातमी अथवा अक्षेपाई कोणतीही पोस्ट प्रसारीत करणारे व्यक्तीवर सायबर पोलीस स्टेशन, पोलीस अधिक्षक कार्यालय नांदेड हे बारीक लक्ष ठेवुन असुन त्यांचा शोध घेवुन त्यांच्यावर कायदेशिर कार्यवाही करण्यात येत आहे.

नांदेड जिल्हयातील सर्व जनतेनी अशा प्रकारच्या अक्षेपाई पोस्ट पासुन सावध व्हावे. असे अवाहन **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड यांनी केले आहे

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड